# बृहन्मुंबई महानगरपालिका

सहाय्यक आयुक्त जी/दक्षिण विभाग यांचे कार्यालय, सहा.अभियंता(परिरक्षण) जी/दक्षिण, जी/दक्षिण कार्यालय, पहिला मजला,
धनमिल नाका, ना.म.जोशी मार्ग, मुंबई- 400 013, दुरध्वनी क्र. 022-24305035, ई.मेल- ac.gs@mcgm.gov.in

क्र.सहा.अभि.(परि)/जी.द./234/ दिनांक :- 07/05/2026

## सेवाभावी संस्थांमार्फत कामगार पुरवठा करण्यासंबंधी सूचना

सदर सुचनेव्दारे सर्व नोंदणीकृत स्थानिक सेवाभावी संस्थांना (NGO) कळविण्यात येते की, जी/दक्षिण विभागातील आपत्कालीन कक्षात दाखल होणा-या विविध प्रकारच्या तक्रारींच्या अनुषंगाने कारवाई करण्याकरीता (NGO) कामगारांची आवश्यकता असल्याने त्याकरीता बेरोजगार / सेवाभावी संस्थांमार्फत 90 दिवसांच्या कालावधीसाठी मागणीनुसार कामगार (NGO) पुरवण्याकरीता खालील अटींनुसार ईच्छुक सेवाभावी (NGO) संस्थांनी सहाय्यक आयुक्त जी/दक्षिण विभाग कार्यालय येथे सहाय्यक अभियंता (परिरक्षण) जी/दक्षिण यांच्या नावे नोंदणी प्रमाणपत्राच्या सत्यप्रती सहित दि.08.05.2026 पासुन दि.12.05.2026 रोजी दुपारी 01.00 वाजेपर्यंत अर्ज करावेत. सदर तारखेनंतर प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही.

अटी व शर्ती :-

1. जी/दक्षिण विभागातील अधिका-यांच्या सुचनेनुसार दैनंदिन कामाकरीता मागणी केलेल्या पाळीत (दिवस/दुपार) सुरळीतपणे, विनालंब, सक्षम कामगारांचा पुरवठा करणे.
2. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रचलित दर परिपत्रकानुसार सद्य दर रु.792.30 प्रतिदिन प्रति कामगार या दराने कामगार पुरवठा करणे.
3. सेवाभावी संस्थांनी केलेल्या अर्जाची छाननी/पडताळणी करुन सोडत पध्दतीने सदर कामासाठी आवश्यक संस्थांची निवड करण्यात येईल.
4. कामासाठी लागणारे आवश्यक सामुग्री, साहित्य उपकरणे पुरविण्यास संस्था बंधनकारक राहिल.
5. सर्व संस्थांनी त्यांच्या वेंडर कोड सहित अर्ज करणे बंधनकारक आहे.
6. कामगारांची सुरक्षा विषयक संपुर्ण जबाबदारी सदर संस्थेची असुन महापालिका याबाबत जबाबदार असणार नाही. तसेच सदर कामगारांना आवश्यक असणारी राहण्याची सुविधा पुरविण्याची जबाबदारी सदर संस्थेची राहील.
7. पुरवठा केलेल्या कामगारांच्या देयकाची रक्कम बृहन्मुंबई महानगरपालिका नियमांनुसार आवश्यक पडताळणी व लेखा परिरक्षणानंतर केली जाईल.
8. बाल कामगारांना पुरवठा करणे निषिध्द आहे व तसे केल्यास त्याची संपुर्णत: कायदेशीर जबाबदारी संबंधित सेवाभावी संस्थेची राहिल.
9. नेमणुक केलेल्या सेवाभावी संस्थांनी कामाच्या पुर्ततेसंबंधी शपथपत्र रु.100 च्या स्टॅम्पपेपरवर द्यावेत.
10. अयोग्य अर्ज कोणताही पत्र व्यवहार न करता फेटाळण्याचे अधिकार तसेच वरील अटींचे पालन न करणा-या सेवाभावी संस्थेचे काम त्वरित थांबविण्याचे अधिकार सहाय्यक आयुक्त जी/दक्षिण ह्यांचे राहतील.

सही/-

**सहाय्यक अभियंता (परि.) जी/दक्षिण**